I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 369-370
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपूर जिल्हयातील दारिद्रय रेषेखाली कुटूंबांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यात शासकीय योजनांची भुमीका

राहुल संबाजी पथाडे व व्ही.व्ही. लाडे
संशोधन केंद्र डॉ. खत्री महाविदयालय,चंद्रपूर

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

भारत देश हा नैसर्गिक साधनसामुग्रीने संपन्न आहे असे म्हणतात पण त्या साधनसामुग्रीचा वापर करुन काही लोक खुपच श्रीमंत झालेले आहेत तर या देशातील ८०% नागरीक हे कमी उत्पन्न गटातील आहेत. त्यातही जवळपास ७०% नागरीक हे आजही गरीबीची जीवन जगत आहेत त्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे संपत्तीचे योग्य वाटप न होणे. एकुण ७०% गरीत असलेल्या लोकांचे सरकारने वेगवेगळे गट विभागलेले आहे त्यामुळे APL, BPL, AYO असे गट आहेत. त्यापैकी BPL आणि AYO हे फार गरीब असल्याचे सरकार द्वारे निर्धारित करण्यात आलेले आहे, त्यांची कौटुंबीक स्थीती सुधारण्यासाठी सरकारद्वारे अनेक योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये स्वस्त अन्नधान्य पुरवठा, मोफत आरोग्य सेवा, मुलीच्या लग्नासाठी मदत, व्यवसायासाठी कर्ज व अनुदान योजना या सारख्या अनेक योजना आहेत पण त्यांची योग्य अमंलबजावणी न झाल्याने अनेक लोकांना फायदा घेता येत नाही. भ्रष्टाचारामुळे सुद्धा या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्याने दिसुन आले. जर या योजनांची योग्य अंमलबजावणी झाली तर नक्कीच BPL कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा उंचावेल यात शंकाच नाही.

**बीजसंज्ञा :-** नैसर्गीक साधनसंपत्ती, संपत्तीचे अयोग्य वाटप, गरीबांचे प्रकार, गरीबी रेषेखालील कुटुंब, सरकारी योजना, योजनांची अंमलबजावणी

## प्रस्तावना :-

भारत देश हा नैसर्गीक साधनसंपत्ती व सर्वात तरुण मनुष्यबळ लाभलेला जगातील एकमेव देश आहे. एवढी मोठी नैसर्गीक साधनसंपत्ती अजूनही आपल्या देशातील तरुण लोकांना आजही गरीबीखाली जिवन जगत आहे. या देशात उपलब्ध साधनसंपत्तीचा अतोनात वापर करुन येथील भांडवलदार हा गर्भश्रीमंत झालेला आहे तर येथील ज्या संपत्तीचा खरा मालक असलेला देशातील तरुण हा फक्त कामावर बनुन राहीलेला आहे आणि गरीबीखाली आपले जीवन व्यतीत करत आहे. सरकारने गरीबी हटाव मोहीमे अंतर्गत अनेक योजना आणल्या आहेत त्या योजनांच्या अमलबजावणीकरीता गरीबीचे अनेक प्रकारात विभाजन केलेले आहे, कारण काही खुप गरीब आहेत तर काही लोक आपली उपजीवीका पुर्ण करु शकतात, जे लोक आपल्या मुलभुत गरजा पुर्ण करु शकत नाही असेही अनेक कुटुंब आहेत त्यामुळे त्यांचे वर्गीकरण अनेक भागात करण्यात आलेले आहे.

## गरीबीचे प्रकार :-

१) अल्पकालीन दारिद्रय
२) दिर्घकालीन दारिद्रय
३) दिर्घकालीन व्यक्तीगत दारिद्रय

या सर्वांना योजनांचा फायदा घेता यावा यासाठी सरकार द्वारे दारिद्रयी लोकांचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आलेले आहे ते पुढीलप्रमाणे

१) दारिद्रय रेषेवरील (APL)

२) दारिद्रय रेषेखालील (BPL)

३) अंत्योदय (AYO)

यातील क्रमांक २ व ३ हे अत्यंत गरीत म्हणुन संबोधले गेलेले आहे त्यामुळे त्यांसाठी शासनाद्वारे अनेक योजना राबवीण्यात येत आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्वस्त धान्य योजना

२) मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत योजना

३) व्यवसायासाठी कर्ज व अनुदान योजना

४) इंदिरा आवास योजना

५) रमाई घरकुल योजना

६) मोफत आरोग्य सेवा योजना

अशा अनेक योजना सरकारद्वारे BPL कुंटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याकरीता राबवीण्यात येत आहेत पण त्यांची अंमलबजावणी योग्य होत नसल्याने चंद्रपुर जिल्हयातील BPL कुंटंबांना फारसा फायदा झालेला दिसुन येत नाही. भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे BPL कुंटुंबांना सरकारच्या योजनांचा फारसा फायदा झालेला दिसत नाही. संशोधनात असे आढळुन आले की, स्वस्त धान्य दुकानदार BPL कुंटुंबांच्या हक्काचे धान्य त्यांना दोन तीन महीने देत नाहीत. आवास योजनांचे अनुदान कर्मचारी कमीशन घेतल्याशीवाय देत नाही. त्यामुळे अनेकांच्या घरांचे स्वप्न व काम हे अर्धवट असल्याचे दिसुन आले. अशा अनेक समस्या BPL कुंटुंबांसमोर आहेत.

जर सरकारणे विशेष लक्ष घालून, जिल्हा प्रशासनाने जर योग्य लक्ष दिले तर या योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने झाली तर चंद्रपुर जिल्हयातील BPL कुंटुंबांना या सर्व योजनांचा लाभ मिळेल व त्यांचे राहणीमान सुधारण्यास त्यांना मदत मीळेल.

**संदर्भ :-**

बिपीएल कार्यालयाचा वार्षिक अहवाल

सरकारच्या योजनांचा अहवाल

जिल्हा सांख्यीकी कार्यालयाचा वार्षिक अहवाल

www.bplscheme.com

www.google.com